
महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगांव कॅम्प
वाङ्मय मंडळाचे उद्घाटन
व कवयित्री स्वाती पाटील यांच्या
'विस्तवाचे ओझे' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा
बुधवार दि.१६ मार्च २०२२
प्रमुख अतिथी
मा.डॉ.अरुणा ढेरे
(सुप्रसिद्ध लेखिका)
Welcome!
Shot on OnePlus
Powered by Dual Camera


Shot on OnePlus
Powered by Dual Camera


Welcome!
Shot on OnePlus
Powered by Dual Camera


महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगांव कॅम्प
बुधवार दि.१६ मार्च २०२२
प्रमुख अतिथी
मा.डॉ.अरुणा ढेरे
(सुप्रसिद्ध लेखिका)
मा.डॉ.संपदादीदी हिरे
प्राचार्य डॉ.दिनेश शिरुडे
MSG College
Welcome!
Shot on OnePlus
Powered by Dual Camera


महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगांव कॅम्प
MSG College
Welcome!


महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय, मालेगांव कॅम्प
वाङ्मय मंडळाचे उद्घाटन
व कवयित्री स्वाती पाटील यांच्या
'विस्तवाचे ओझे' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा
बुधवार दि.१६ मार्च २०२२
मा.डॉ.संपदादीदी हिरे
.दिनेश शिरुडे






महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित
महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालय,मालेगांव कॅम्प
वाङ्मय मंडळाचे उद्घाटन
व कवयित्री स्वाती पाटील यांच्या
'विस्तवाचे ओझे' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा
बुधवार दि.१६ मार्च २०२२
मा.डॉ.अरुणा ढेरे

# कवी दुज्या सृष्टीचे ईश्वर असतात

## डॉ. अरुणा ढेरे यांचे प्रतिपादन

**म. टा. वृत्तसेवा**, मालेगाव

कवी संवेदनशीलपणे आपले जीवन अनुभव मांडतो. कवितेची भाषा तुमची माझीच असते. पण प्रतिभेच्या बळावर तो हे सगळे अनुभव वेगळ्या पातळीवर नेऊन ठेवतो. त्यातून कवीचा जीवनविषयक दृष्टिकोन कळतो. जे आपल्याला दिसतं नसतं ते तो शब्दांतून मांडतो म्हणूनच कवी दुज्या सृष्टीचे ईश्वर असतात, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या माजी अध्यक्ष, लेखिका डॉ. अरुणा ढेरे यांनी केले.

महाराजा सयाजीराव गायकवाड महाविद्यालयातील वाङ्‌मय मंडळाचे उद्‌घाटन व कवयित्री स्वाती पाटील यांच्या 'विस्तवाचे ओझे' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन बुधवारी (दि. १६) झाले त्यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. ढेरे बोलत होत्या. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिनेश शिरुडे



होते. तर व्यासपीठावर संस्थेच्या विश्वस्त डॉ. संपदा हिरे, लेखक स्वानंद बेदरकर, प्राचार्य डॉ. सुभाष निकम, कवयित्री स्वाती पाटील, कवी कमलाकर

कल्चर वार्ता

देसले, डॉ. विनोद गोरवाडकर, प्राचार्य डॉ.उज्ज्वला देवरे, उपप्राचार्य डॉ. सी. एम. निकम आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ. शिरुडे यांनी स्वाती पाटील या 'मसगा'च्या माजी विद्यार्थिनी असल्याचा अभिमान वाटतो. लहानवयात मातृपितृ छत्र हरपलेल्या स्वाती यांची प्रतिभा कवितेतून कळते. म्हणूनच 'विस्तवाचे ओझे' काव्यसंग्रह प्रकाशित व्हावा यासाठी पाठबळ दिल्याचे म्हटले.

### 'स्त्री जीवनाबाबत विसंगती'

डॉ. ढेरे म्हणाल्यात की, स्वाती यांच्या जीवन संघर्षात त्या एकट्या चालत होत्या. परंतु, त्यांच्या आतून त्यांची कविता त्यांच्या सोबतीला होती. 'विस्तवाचे ओझे' यातील कविता सामाजिक भान जपणाऱ्या आहेत. स्त्रीविषयक समाजाचा दृष्टिकोन यावर बोलताना आजही स्त्री जीवनाबाबत समाजात मोठी विसंगती दिसून येत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. भारतीय स्त्रीवाद हा पुरुषांविरुद्ध नव्हता. स्त्रियांना माणूसपणाची ओळख हवी होती. गेल्या १५० वर्षांत त्यांना संधी मिळाली आणि आज त्या झेपावल्या आहेत. सूत्रसंचालन प्रा. डॉ. नेरे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय लिना शेलार यांनी केला. प्रा. राज त्रिभूवन यांनी आभार मानले.

# साहित्य हे संस्कृतीचे अविभाज्य अंग

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अरुणा ढेरे यांचे प्रतिपादन

लोकनामा प्रतिनिधी



**मालेगाव : मसगा महाविद्यालयात वाङमय मंडळाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना डॉ. अरुणा ढेरे. समवेत संस्थेच्या विश्वस्त संपदादीदी हिरे, प्राचार्य डॉ. दिनेश शिरूडे, प्रा. स्वाती पाटील आदी मान्यवर.**

मालेगाव : मानवी जीवनाला अनुभूतीचे अंग जोडण्यासाठी साहित्याची अनिवार्यता असते. या अनिवार्यतेच्या पोटात चिंतनाचा अक्षय झरा वाहत असतो. तोच प्रत्येकाला वैचारिक प्रगतीसाठी उपयुक्त ठरतो, म्हणूनच साहित्य हे संस्कृतीचे अविभाज्य अंग असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अरुणा ढेरे यांनी केले.

महात्मा गांधी विद्या मंदिर संस्था संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात वाङमय मंडळाच्या उद्घाटन, तसेच संस्थेच्या माजी विद्यार्थिनी प्रा. स्वाती पाटील यांच्या 'विस्तवाचे ओझे' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिनेश शिरूडे होते. प्रमुख पाहुण्या म्हणून संस्थेच्या विश्वस्त, जनसंपर्क व सांस्कृतिक विभागाच्या समन्वयक संपदादीदी हिरे उपस्थित होत्या. यावेळी मंचावर कवयित्री स्वाती पाटील, कवी कमलाकर देसले, व्याख्याते स्वानंद बेदरकर, निमगाव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम, श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उज्वला देवरे, येवला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे, काव्यसंग्रहाचेचे संपादक डॉ. विनोद गोरवाडकर, उपप्राचार्य डॉ. सी. एम. निकम, डॉ. एन. बी. बच्छाव, प्रा. प्रफुल्ल निकम आदी मान्यवर उपस्थित होते.

लोकसाहित्यापासून आधुनिक साहित्यापर्यंत प्रत्येक ठिकाणी स्त्रियांचा मोठा सहभाग असून, अनअक्षर असणे आणि अडाणी असणे यांतील फरक प्रत्येक महिलेने समजून घ्यायला हवा, असेही डॉ. ढेरे म्हणाल्या. हिरे यांनी स्वाती पाटील यांच्या कवितेत एका स्त्रीच्या अंतर्मनाचा हुंकार उमटला असल्याचे सांगून साहित्यावर आपले भाष्य व्यक्त केले. डॉ. शिरूडे यांचे भाषण झाले.

यावेळी संस्थेच्या माजी विद्यार्थिनी प्रा. स्वाती पाटील यांच्या 'विस्तवाचे ओझे' या काव्यसंग्रहाचे याप्रसंगी प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी इम्रान खान या विद्यार्थ्याने स्वागत केले. डॉ. अनिता नेर यांनी सूत्रसंचालन केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. लीना शेलार यांनी, तर स्वागत डॉ. ए. जी. नेरकर यांनी केले. डॉ. राज त्रिभुवन यांनी आभार मानले. कार्यक्रमास शहरातील साहित्यप्रेमी, प्राध्यापक-प्राध्यापिका उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी डॉ. अरुण पाटील, डॉ. सूर्यवंशी, डॉ. साजिद अन्सारी, डॉ. सपना सोनवणे, प्रा. वर्षा अहिरे, डॉ. संतोष कन्नूर, प्रा. विनोद केदारे ,डॉ. वानखेडे, डॉ. सी. आर. पाटील, डॉ. अय्याज शाह, प्रा. दीपक आहिरे, प्रा. साकेत शिरसाट यांनी परिश्रम घेतले.

दैनिक दि. १९।३।२०२२
लोकनामा ™
सर्वसामान्यांच्या समस्यांना वाचा फोडणारे दैनिक

# साहित्य हे संस्कृतीचे अविभाज्य अंग

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अरुणा ढेरे यांचे प्रतिपादन

लोकनामा प्रतिनिधी



**मालेगाव : मसगा महाविद्यालयात वाङ्मय मंडळाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना डॉ. अरुणा ढेरे. समवेत संस्थेच्या विश्वस्त संपदादीदी हिरे, प्राचार्य डॉ. दिनेश शिरूडे, प्रा. स्वाती पाटील आदी मान्यवर.**

मालेगाव : मानवी जीवनाला अनुभूतीचे अंग जोडण्यासाठी साहित्याची अनिवार्यता असते. या अनिवार्यतेच्या पोटात चिंतनाचा अक्षय झरा वाहत असतो. तोच प्रत्येकाला वैचारिक प्रगतीसाठी उपयुक्त ठरतो, म्हणूनच साहित्य हे संस्कृतीचे अविभाज्य अंग असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अरुणा ढेरे यांनी केले.

महात्मा गांधी विद्या मंदिर संस्था संचलित महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात वाङ्मय मंडळाच्या उद्‌घाटन, तसेच संस्थेच्या माजी विद्यार्थिनी प्रा. स्वाती पाटील यांच्या 'विस्तवाचे ओझे' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिनेश शिरूडे होते. प्रमुख पाहुण्या म्हणून संस्थेच्या विश्वस्त, जनसंपर्क व सांस्कृतिक विभागाच्या समन्वयक संपदादीदी हिरे उपस्थित होत्या. यावेळी मंचावर कवयित्री स्वाती पाटील, कवी कमलाकर देसले, व्याखयाते स्वानंद बेदरकर, निमगाव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष निकम, श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. उज्वला देवरे, येवला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे, काव्यसंग्रहाचेचे संपादक डॉ. विनोद गोरवाडकर, उपप्राचार्य डॉ. सी. एम. निकम, डॉ. एन. बी. बच्छाव, प्रा. प्रफुल्ल निकम आदी मान्यवर उपस्थित होते.

लोकसाहित्यापासून आधुनिक साहित्यापर्यंत प्रत्येक ठिकाणी स्त्रियांचा मोठा सहभाग असून, अनअक्षर असणे आणि अडाणी असणे यांतील फरक प्रत्येक महिलेने समजून घ्यायला हवा, असेही डॉ. ढेरे म्हणाल्या. हिरे यांनी स्वाती पाटील यांच्या कवितेत एका स्त्रीच्या अंतर्मनाचा हुंकार उमटला असल्याचे सांगून साहित्यावर आपले भाष्य व्यक्त केले. डॉ. शिरूडे यांचे भाषण झाले.

यावेळी संस्थेच्या माजी विद्यार्थिनी प्रा. स्वाती पाटील यांच्या 'विस्तवाचे ओझे' या काव्यसंग्रहाचे याप्रसंगी प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी इम्रान खान या विद्यार्थ्याने स्वागत केले. डॉ. अनिता नेर यांनी सूत्रसंचालन केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. लीना शेलार यांनी, तर स्वागत डॉ. ए. जी. नेरकर यांनी केले. डॉ. राज त्रिभुवन यांनी आभार मानले. कार्यक्रमास शहरातील साहित्यप्रेमी, प्राध्यापक-प्राध्यापिका उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वितेसाठी डॉ. अरुण पाटील, डॉ. सूर्यवंशी, डॉ. साजिद अन्सारी, डॉ. सपना सोनवणे, प्रा. वर्षा अहिरे, डॉ. संतोष कन्नूर, प्रा. विनोद केदारे ,डॉ. वानखेडे, डॉ. सी. आर. पाटील, डॉ. अय्याज शाह, प्रा. दीपक आहिरे, प्रा. साकेत शिरसाट यांनी परिश्रम घेतले.